साक्षीदार क्र **०१** ची सरतपासणी
देवाची शपथ खरे सांगतो
नाव :–संजय रामचंद्र सोनकुसरे.
वय :–५५ वर्ष, व्यवसाय–मॅनेजर सेंट्रल बँक.
राह.सेंट्रल बँक उमरेड तह.उमरेड, जि.नागपूर.

**सरतपास तक्रारदारातर्फे वकील श्री.पी.जी.आर.हुंगे यांच्यामार्फत शपथेवर सुरू**

**१.** माझे शपथ पत्र नि. क्र. २७ मधील मजकुर खरा व बरोबर असून त्यावर माझी सही आहे. मी अभिलेखांवर खालील दस्तावेज दाखल केला आहे.

**ए)** आरोपीने मला दि.२७/०७/२०१७ रोजी धनादेश दिला होता तो धनादेश क्र.०१३०७४ मी अभिलेखावर दाखल केला तो धनादेश रक्कम रूपये ५०,५१९/– चा आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यावर आरोपीची सही आहे. त्यास **नि. क्र.२८** देण्यात आला.

**बी)** सदर धनादेश अपर्याप्त निधीच्या कारणावरून परत आला आता मला सदर दि.२७/०७/२०२७ रोजीचा मेमो दाखविला त्यावर शाखा प्रबंधक यांची सही व शिक्का आहे त्यास **नि. क्र.२९** देण्यात आला.

**सी)** त्यानंतर सदर चेक न वटविल्यामुळे चेक रकमेची पुर्तता करणेकामी मी त्याला दि.०१/०८/२०१७ रोजी रजिस्टर नोटिस वकीलामार्फत पाठविली त्यावर वकीलसाहेबांची सही आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास **निशानि क्र.३०** देण्यात आले.

**डी)** सदर नोटीस पाठविल्याची पोस्टल रिसिप्ट मी अभिलेखावर दाखल केली त्यावर आरोपीची सही आहे त्या **नि.क्र.३१** देण्यात आला.

**इ)** सदर नोटीस मिळाल्याची पोचपावती मी अभिलेखावर दाखल केली त्यावर आरोपीची सही आहे त्या **नि.क्र.३२** देण्यात आला.

**फ)** त्यानंतर आरोपीने आमच्या बँकेमधुन कर्ज घेतले होते त्याबाबत सर्टीफिकेट ऑफ अकाउंट व खातेउतारा अभिलेखावर दाखल केला त्यावर शाखाप्रबंधक म्हणुन सेंट्रल बँकेचा सही व शिक्का आहे त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे त्यास अनुक्रमे **नि.क्र.३३ व ३४** देण्यात आला आहे.

**सरतपास पूर्ण**

**उलटतपास, आरोपी व आरोपींच्या वकीलाचा पुकारा केला असता गैरहजर सबब उलट तपास नाही.**

वा.दा.ब.अ.सा. समक्ष

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड
०६.०३.२०२५

(आर.एस.मानकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, उमरेड